लोकमत

# ज्येष्ठांच्या आठवणींना उजाळा

## राजकुमार बडोले : ज्येष्ठोत्सव कार्यक्रम उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : आमच्याच युद्धात आम्ही कधी हरलो, कधी जिंकलो... काही स्वप्ने दुभंगली, काही स्वप्ने झाली खरी... अशा काव्यमय शब्दांत ज्येष्ठ नागरिकांच्या कटू-गोड आठवणी व्यक्त केल्या सामाजिक न्याय विभागाचे मंत्री राजकुमार बडोले यांनी. निमित्त होते जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे.

पुण्यात सामाजिक न्याय विभागाच्यावतीने 'ज्येष्ठोत्सव-२०१८' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे उद्घाटन बडोले यांनी केले. त्यावेळी त्यांनी आपली कविता सादर केली. कार्यक्रमास सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, आमदार मेधा कुलकर्णी, बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक कैलास कणसे, शां. ग. महाजन, अभिनंदन थोरात, प्रतिभा शाहू मोडक, माधव वझे, सुधीर गाडगीळ, विश्वास मेहेंदळे, डॉ. मोहन आगाशे, ज्येष्ठ अभिनेत्री दीपा लागू, ज्येष्ठ लेखिका अरुणा ढेरे, ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आदींची उपस्थिती होती.

राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाचा समाजाला लाभ होत असल्याचे सांगू शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठ असलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलनाने झाले. प्रास्ताविकात आमदार कुलकर्णी यांनी ज्येष्ठोत्सव २०१८ च्या आयोजनामागील उद्देश सांगितला. यावेळी डॉ. अरविंद संगमनेरकर, न. म. जोशी, लता पुणेकर, विनोद शहा, मनीषा साठे बापूसाहेब घाटपांडे, म. भा. चव्हाण तसेच वयाची शंभरी पार केलेल्या नलिनी देवधर, वसंतराव म्हस्के अशोक नाफडे आदींसह विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.



ज्येष्ठोत्सवात सत्कारप्रसंगी (डावीकडून) मोहन आगाशे, विनोद शहा, मेधा कुलकर्णी, राजकुमार बडोले, अनिल शिरोळे.

- सामाजिक न्यायमंत्री बडोले यांनी ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असल्याची ग्वाही दिली. ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असावा, त्याचे आरोग्य चांगले राहावे.
- यासाठी जुलै २०१८ मध्ये वेगवेगळ्या विभागांनी काय करायचे, याची जबाबदारी निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी ५ टक्के जागा राखीव ठेवणे, आरोग्य तपासणी शिबिरे घेणे अशा विविध उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली.